शैक्षणिक संदर्भ अंक १२३ एप्रिल-मे २०२०

# माणुसकीला नेते नाहीत

लेखक: युवाल नोआ हरारी स्वैर रूपांतर: नीलिमा सहस्रबुद्धे

# माणुसकीला नेते नाहीत

**लेखक: युवाल नोआ हरारी        स्वैर रूपांतर: नीलिमा सहस्रबुद्धे**

करोना व्हायरस सगळ्या जगभर पसरलाय, त्याचं कारण जागतिकीकरणामध्ये असल्याचं अनेकांचं म्हणणं आहे. "भविष्यात अशी संकटं टाळायची, तर जागतिक संपर्क कमी करा; व्यापार थांबवा, प्रवास बंद करा, राष्ट्राराष्ट्रात भिंती उभ्या करा!!!"

पण लक्षात घ्या, एकांतवास किंवा क्वारंटाईन हा तातडीचा उपाय आवश्यक असला तरी, तो काही दीर्घकालीन उपाय नव्हे. रोगापासून काहीही सुरक्षितता मिळण्याऐवजी जगाची आर्थिक घडी मात्र विस्कटून जाईल. या साथींच्या विरुद्ध उभे ठाकायचे, तर सहकार्य गरजेचे आहे, विलगीकरण नव्हे!

जागतिकीकरणाच्या आधीही साथी येत होत्या, १४व्या शतकात काळा आजार पूर्व आशियातून पश्चिम युरोपात पसरला, दहाएक वर्षं लागली त्याला. २० कोटीपर्यंत मृत्यू पावले (युरेशियातील एक चतुर्थांश लोक). इंग्लंडमधले ४०%.

१५२० साली देवी रोगाचा फक्त एक वाहक मेक्सिकोमध्ये जाऊन पोचला, तेव्हा तिथे बस नी रेल्वे सोडा, गाढवे पण नव्हती... पण ८-९ महिन्यात देवी रोग इतका पसरला की मध्य अमेरिकेतली एक तृतीयांश जनता मरण पावली. १९१८ मधली इन्फ्ल्यूएन्झाची

साथ काही महिन्यातच जगभर पसरली. भारतात ५% लोकांना, ताहिती बेटावर १४% ना तर सामोआ बेटावर २०% लोकांना मरण आले. पहिल्या महायुद्धापेक्षा जास्त!



***काळ्या आजाराने मृत्युमुखी पडलेल्यांचा दफनविधी, १४ व्या शतकातील युरोपमधील चित्र (स्रोत [https://commons.wikimedia.org/wiki/File:Doutielt3.jpg](https://commons.wikimedia.org/wiki/File:Doutielt3.jpg))***

गेल्या शंभर वर्षांत परिस्थिती बदलली आहे. आता जीवाणू-विषाणूंना लागण करण्यासाठी वाढलेली लोकसंख्या सहज उपलब्ध आहे. जगभर पसरण्यासाठी आता वेळही लागणार नाही.

पण तरीही आता अशा साथी वाढलेल्या नाहीत, कमीच झाल्यात. एड्स आणि इबोलासारखे भयंकर रोग असले, तरी मृत्यूचे प्रमाण लक्षणीयरित्या कमी झालेय. यात सर्वात महत्त्वाचे अस्त्र आहे माहितीचे. माणसे माहितीच्या विश्लेषणावर अवलंबून आहेत, तर विषाणू आंधळ्या म्युटेशनवर.


गेल्या शतकभरात साथ येते कशामुळे, नवे आजार निर्माण कसे होतात, त्यावर उपाय कशाने करता येतील यावरचा सर्व अभ्यास जगात सर्व देशांनी एकमेकांना सांगून सहकार्य केले. त्यामुळे करोना विषाणू ओळखायला, त्याचा जीनोम ठरवायला आणि बाधित लोक ओळखण्याची तपासणी शोधून काढायला शास्त्रज्ञांना दोनच आठवडे लागले.

मुळात साथीचे कारण समजले की सामना करणे शक्य होते. १९६७ साली १५० लाख लोकांना देवी रोग झाला, त्यातले २० लाख मरण पावले. पण जगभरात राबवलेल्या लसीकरणामुळे १९७९ साली तो रोग नष्ट झाल्याचे घोषित करता आले.

**हा सगळा इतिहास काय सांगतोय?**

एक तर आपल्याभोवती सुरक्षा भिंती घालून भागणार नाही. वैज्ञानिक माहिती एकमेकांना पुरवणे आणि एकत्रित येऊन लढा देणे हे मात्र शक्य आहे. एखादी साथ आलीच, तर त्याबद्दल खात्रीशीर माहिती दुसऱ्या देशांना दिली पाहिजे. आर्थिक क्षेत्रात होणारे नुकसान डोळ्यापुढे ठेवून माहिती लपवणे किंवा माहिती दिल्यावर त्या देशाला वाळीत टाकणे हा मार्गच नाही. संपूर्ण जागतिक पातळीवर विश्वासाचे आणि सहकार्याचे वातावरण असावे लागेल.

संसर्ग वाचवण्यासाठी अलगीकरण जर उपयुक्त ठरायचे असेल, तर त्यासाठी सर्वांचे सहकार्य हवे. अलगीकरण करावे तर लागेल, पण प्रत्येक देश त्याबद्दल आपलाच विचार करेल, इतर देशांवर अविश्वास दाखवेल, तेव्हा त्यातून योग्य काळजी घेता येईल का? इतरांनी अलगीकरण करावे, आम्ही मात्र करणार नाही... हे कसे उपयुक्त ठरणार?



***कोविड १९ या आजाराला कारणीभूत नॉव्हेल करोनाव्हायरस***

*(स्रोत[https://commons.wikimedia.org/wiki/File:Coronavirus_SARS-CoV-2.jpg](https://commons.wikimedia.org/wiki/File:Coronavirus_SARS-CoV-2.jpg))*

साथीच्या रोगांबाबत सर्वात महत्त्वाचे जाणून घ्यायला हवे, की साथ कुठल्याही देशात आली, तरी ती पूर्ण मानवजातीला धोका ठरणार आहे. त्याचे कारण म्हणजे कुठलाही विषाणू सतत उत्क्रांत होतच असतो.

करोनासारखा विषाणू वटवाघळासारख्या प्राण्यात निर्माण होतो. मुळात तो माणसाच्या शरीरात जगायला सक्षम नसतो. पण एकदा माणसाच्या शरीरात शिरल्यावर तिथे प्रतिकृती तयार होऊ लागतात... त्यामध्ये उत्परिवर्तन होऊ लागते, त्यातले एखादे मात्र माणसाच्या पेशीत जगण्यासाठी अत्यंत सक्षम असे असू शकते. आता या विषाणूच्या प्रतिकृती, एकेका माणसात लक्षावधी, दुसऱ्यांना बाधित करतात. बाधा झालेल्या प्रत्येक माणसात विषाणूच्या लक्षावधी प्रतिकृती निर्माण होतात, तितक्याच संधी प्रत्येक वेळी

उत्परिवर्तन होण्यासाठी मिळतात. हे एखाद्या लॉटरीसारखेच असते. प्रत्येक तिकीट म्हणजे प्रत्येक प्रतिकृती ही उत्परिवर्तनाने सक्षम होण्याची संधी असते. २०१४च्या इबोला आजारात असे झाल्याचे दिसले आहे. यानंतर या उत्परिवर्तीत विषाणूची बाधा माणसाला झटकन होऊ लागते.

त्यामुळे प्रत्येक देशातील प्रत्येक माणसाला यापासून वाचवले, तरच हा विषाणू नष्ट होऊ शकतो. एक जरी बाधित शिल्लक असेल, तर पुन्हा लागण होण्याची शक्यता उरतेच.

दुनियाभरात असंख्य विषाणू आहेत. त्या सर्वात सतत उत्परिवर्तन चालूच आहे. त्यापासून माणसाला वाचवायचे, तर प्रत्येक माणसाला वाचवायला हवे. आरोग्यव्यवस्था प्रत्येकाला उपलब्ध हवी. मुळात मूलभूत आरोग्यव्यवस्था अनेकांना उपलब्धच नसेल, तर ती माणसे सुरक्षित कशी असणार? आणि पर्यायाने मानवजात इथे असुरक्षित ठरणार. पण हे आपल्या ध्यानात येत नाही. साथीपासून वाचायचे असेल तर फक्त श्रीमंत देशातली माणसे वाचवून भागणार नाही... प्रत्येक गरीब देशातला प्रत्येक गरीब माणूसही त्यातून वाचायला हवा. पण हे आज आपल्या नेत्यांच्या लक्षात आलेले दिसत नाही.

## दुनियेची निर्नायकी अवस्था

करोना व्हायरस हे एक कारण झालं, पण आज माणसातल्या अविश्वासामुळे मानवजातीची अवस्था बिकट झालेली आहे. साथ हटवायची असेल, तर माणसांचा वैज्ञानिकांवर, नागरिकांचा अधिकाऱ्यांवर आणि देशांचा इतर देशांवर विश्वास असायला हवा. गेल्या काही वर्षात या सगळ्या ठिकाणी अविश्वासाचे वातावरण वाढले आहे. त्यामुळे जागतिक पातळीवर कोणी नेता काही जागतिक उत्तर शोधू शकेल असं दिसत

नाही. २०१४च्या इबोला साथीप्रमाणे आता अमेरिकाही असा पुढाकार घेत नाही आहे. जागतिक आरोग्य संघटनेला आता तिथून आधार मिळेनासा झाला आहे. युरोपियन युनियन एकत्र येऊन सामना करते का ते आता दिसेल.

थोडक्यात म्हणजे, जगभरातील सर्वांनी एकत्र येऊन याचा सामना केला नाही, तर हे करोनालाच नाही, भविष्यातल्या नव्या विषाणूंनाही आमंत्रण ठरेल.

*मूळ लेख : In the Battle Against Coronavirus, Humanity Lacks Leadership, Yuval Noah Harari, Time, 15 March 2020.*

*https://time.com/5803225/yuval-noah-harari-coronavirus-humanity-leadership/*

§§§

---

**लेखक: युवाल नोआ हरारी,** हिब्रू विश्वविद्यालय, येरुसलेम इथे प्राध्यापक, आंतरराष्ट्रीय ख्यातीप्राप्त लेखक.

**स्वैर रूपांतर: नीलिमा सहस्रबुध्दे**, शैक्षणिक संदर्भ संपादक गटात सहभागी.

इमेल : neelimasahasrabudhe@gmail.com

# करोना व्हायरस साथीशी लढा

***जयप्रकाश मुलीयील**, वेल्लोरच्या ख्रिश्चन मेडिकल कॉलेजचे माजी प्राचार्य, साथीच्या रोगांचे तज्ञ यांच्या scroll.in मध्ये आलेल्या मुलाखतीतील हा काही भाग.*

*स्वैर रूपांतर – नीलिमा सहस्रबुध्दे.*




***भारतातील कोव्हिड-१९ साथीच्या कालावधीतील लॉकडाउनमधील दोन क्षणचित्रे – सर्वजण घरात बसल्याने ओस पडलेला रस्ता विरुध्द शहर सोडून चाललेल्या मजुरांच्या गर्दीने फुललेला रस्ता (स्रोत – विकिमिडिया व सीएनएन)***

**भारतात आधी येऊन गेलेल्या साथींचा अनुभव लक्षात घेऊन आपण काय शिकायला हवे?**

एचवनएनवन (H1N1) साथीच्या वेळी आपण काही करू शकलो नाही, त्यावर आपला काही ताबा नव्हताच. विमानतळावर येणाऱ्यांचं तापमान तपासत राहणं हा फक्त तो रोग देशात येऊ नये यासाठीचा हास्यास्पद प्रयत्न होता. औषधे उपयोगी नव्हती आणि लागण झटकन होत होती. लस सापडली तोपर्यंत साथ गेलीच होती. आपण काही केलं म्हणून नव्हे.

एचवनएनवनपेक्षा कोविड-१९ ची लागण व्हायला थोडा वेळ लागतो, पण जास्त काळ लागण होत राहते. शिवाय लागण झालेल्यांपैकी अर्ध्या लोकांना लक्षणेही दिसत नाहीत. यांच्यामुळे नव्या लागणी होतील का, हा खरं प्रश्न आहे... आपल्याला ते अजून समजलेले नाही.

आपल्या देशात आत्ता ही लागण थांबवायचे प्रयत्न झालेत खरे, पण त्यात राज्याराज्यात बरेच फरक दिसतात. भारतात सुरू झालेल्या कोविड-१९ च्या साथीचा सामुदायिक लागणीचा टप्पा खरं तर सुरू झालेला आहे. तसं कोणी कबूल करत नसलं, तरी! इथून पुढे एकूण ५५% जनतेला ही लागण होऊ शकते. तरीही 'संपूर्ण बंद' सारखे उपाय काही खरे नव्हेत.

**तर मग साथीला तोंड कसे द्यायचे?**

खरे तर चीन ही साथ थांबवू शकला असता, पण त्यांनी ते केलं नाही. त्यांच्याकडे चांगले शास्त्रज्ञ आहेत. पण जिथे स्पष्ट बोलण्याची मोकळीक नाही, तिथे हे असं घडतं!

आपला संपूर्ण देश जितक्या वेगाने कामाला लागायला हवा होता, तितका लागला नाही. लोकांना 'कंटेनमेंट'चा अर्थच समजलेला नाही.

आपण व्हायरस मर्यादित जागेत थांबवण्यासाठी त्याच्या वाहकांवर लक्ष केंद्रित केलं, आणि परिणामी त्यांनाच बदनाम केलं. आजारावर उपाय करण्याच्या ऐवजी आजाऱ्यावर हल्ला केला. आता उद्या असंख्य लोकांना अशी लागण होईल, तेव्हा त्यांना असा कलंक लावण्याचं थांबवलं पाहिजे, पण ही कठीण गोष्ट आहे.

भारतासारख्या देशात साथ येऊच न देणं कठीण आहे. त्यामुळे साथीला तोंड कसं द्यायचं हाच खरा प्रश्न आहे.

दोन मार्ग असतात – आजार कमीत कमी ठेवायचा प्रयत्न आणि संपूर्ण बंदी. आजार कमीत कमी ठेवायचा तर संशयित ठिकाणी अलगीकरण करणे, आजारी आणि त्याचे घर इतरांपासून वेगळे ठेवणे; ज्यांच्यावर परिणाम होण्याची जास्त शक्यता आहे, अशा माणसांना लांब ठेवणे – याची गरज पडते.

ज्या देशात घरोघरी अन्न पोचवता येणे शक्य आहे, तिथे एक वेळ बंदीचा उपाय करता येईल. आपल्या देशात रोज ८०,००० बाळे जन्माला येतात. संपूर्ण बंदी असेल, तर त्यांचे काय होईल? आणि बंदी किती दिवस ठेवता येईल? त्यानंतर लागणीची शक्यता असणारच आहे.

भारतामध्ये बंदी म्हणजे रोजगार बंदी, शोषण, चुकीच्या माणसांकडे अधिकार देणे. त्यापेक्षा सर्वांच्या सहकार्याने आजाराशी लढणे गरजेचे आहे. बंदी आणि सहकार्य एकाच वेळी वास्तवात येत नाहीत. आणि हा लढा बराच काळ द्यावा लागणार आहे. त्याचा शहाणपणानेच विचार करायला हवा.

उदा. प्रत्येक लागण झालेल्याने हॉस्पिटलमध्ये भरती व्हायची गरज नाही, ज्यांना श्वसनाचा त्रास होतो आहे, त्यांनीच व्हावे. बाकीच्यांनी स्वतःला अलग ठेवून, शिस्तीने वागून दुसऱ्यांना वाचवावे.

कोणतेही समारंभ करून एकत्र येऊ नये. गर्दी करणे टाळावे, प्रवास टाळावा. एकूणात लोकांच्यापासून अंतर राखणे हे सहा ते नऊ महिने आवश्यक आहे. त्यामुळेच

व्हायरसचा प्रवास कमी वेगाने होईल. नाही तर रोजगार, अन्नधान्याचा, औषधांचा तुटवडा झाला, तर लोक बंड करून उठतील.

आजाराच्या पहिल्या लाटेमध्ये ५५% लोकांना बाधा होईल असा माझा अंदाज आहे. तेव्हा मृत्यू कमीतकमी राखण्यासाठी प्रयत्न करायला हवेत.

*जयप्रकाश जे म्हणत आहेत ते बरोबरच आहे, पण प्रत्यक्षात लोक ज्या प्रकारे वागत आहेत त्याकडेही लक्ष द्यायला लागेल. इतक्या प्रकारांनी सांगूनसुद्धा लोक किती बेजबाबदारपणे वागत आहेत, ते आपण पाहिले. स्वतःला संसर्ग असण्याची शक्यता लक्षात येऊनसुद्धा ते नाकारण्याचा प्रयत्न अगदी सुशिक्षित लोकही करत आहेत. खोट्या फसव्या गोष्टी समाजमाध्यमांवर फिरत आहेत.*

*समाजाचे सहकार्य ही गोष्ट प्रत्यक्षात यायला तशा सहकार्याचा इतिहासही असायला हवा ना. तशा प्रकारची संस्कृती तयार करत जायला लागेल. गेल्या दहा वर्षात समाजात फक्त अविश्वासाचीच संस्कृती दिसतेय... शास्त्रज्ञांवर, विचारवंतांवर, शहाण्या लोकांवर आणि राजकारण्यांवरसुद्धा अविश्वास. जो आपल्या पक्षाचा नाही, त्यावर विश्वास ठेवायचा नाही! त्याचाच परिणाम आज दिसतो आहे.*

*आपण बुद्धिवादीसुद्धा याला जबाबदार आहोत. जेव्हा केव्हा काही मूर्ख गोष्टी माध्यमांवर येतात, तेव्हा आपण फक्त त्यांना वेड्यात काढतो, हसतो आणि आपल्या शहाणपणाचे प्रदर्शन करतो. बरेचदा त्यातल्या मांडणीतल्या त्रुटी दाखवण्याऐवजी आपण मांडणी करणाऱ्यावर / पाठवणाऱ्यावर हल्ला करतो. त्यामुळे लोक विचार करायला लागणार नाहीत! आपण केलेला अपमान आणि वेड्यात काढणे यामुळे अधिकच अविश्वास निर्माण होतो. आपण हे बदलायलाच हवे आहे. सहानुभाव, तर्क आणि विवेकावर आधारित विचार करणारा समाज कसा तयार होत जाईल, याचा विचार आपण करायला हवा. याहून उशीर करून आता चालणार नाही. कोविड-१९ नंतर, हवामानबदलाच्या संकटाचे त्याहून मोठे आव्हान आपल्यापुढे आहे.*

*प्रियदर्शिनी कर्वे*